# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/03/2023 (शनिवार) सकाळ


## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील परसाळ ता. कामठी जि. नागपुर येथे दिनांक २४/०३/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान ते १७.०० वा दरम्यान फिर्यादी नामे– दुधरामजी मनीरामजी सातनुरकर, वय ५२ वर्ष, रा. परसाळ ता. कामठी जि. नागपुर हे आपल्या परिवारा सोबत मिळुन राहत असुन घरातील सर्व लोंक हे सकाळी १०.०० वा. दरम्यान कामाला जात असुन सायंकाळी परत येत असते. त्या दरम्यान घरी कोणीच नसते. घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हा घराला कुलुप लावुन कामाला गेला व सायंकाळी ०५.०० वा. दरम्यान घरी आला तेव्हा घराचे कुलुप तुटुन दरवाज्या जवळ पडलेले होते तेव्हा फिर्यादी याने घरी जावुन पाहीले असता घरातील सामान अस्त व्यस्त पडलेले होते फिर्यादी हयाची पत्नी घरी आली व तिने डब्यात पाहीले असता डब्यात ठेवलेले चार ग्रॅम सोन्याचे दागीने व सहा ग्रॅम सोन्याची पोत किंमती अंदाजे ३५,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीश यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील जिल्हा परिषद माध्यमीक शाळा कामठी कॉलनी न्यु टेकाडी कन्हान येथे दिनांक २३/०३/२०२३ चे १६.३० वा. ते दिनांक २४/०३/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र दौलतराव मांडवकर, वय ५५ वर्ष, रा. भगवान नगर नागपूर हा जिल्हा परिषद माध्यमीक शाळा कामठी कॉलनी न्यु टेकाडी कन्हान येथे प्रभारी मुख्याधापक पदावर कार्यरत आहेत सन २०१६ मध्ये शाळेमध्ये पाण्याच्या सुविधेकरीता लोंखडी ०३ ईंची पाईप लाईन लावण्यात आली होती दि. २३.०३.२०२३ रोजी ०८.०० वा. ते ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी हे शाळेत हजर होते. दि. २४.०३.२०२३ रोजी ०८.०० वा. दरम्यान शाळेतील विद्यार्थीने सांगीतले की, शाळेतील पाण्याच्या टाकीमध्ये येणारी पाईप लाईन कोणीतरी कापून नेले आहे. शाळेतील मागील बाजूस जावून पाहिले असता अंदाजे २५ फुटाचे लोखंडी ०३ ईंची पाईप किंमती अंदाजे २०००/– रू चे कापून कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रविण चव्हान ब नं २८८ पोलीस स्टेशन कन्हान हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा ढिवरवाडी शिवार येथे दिनांक २०/०३/२०२३ चे २३.०० वा. ते दि. २१/०३/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मंगेश विलासराव शेगावकर, वय ४४ वर्ष, रा. नामपूर. ह. मु. काटोल म. रा. वि. वि. कंपनी मर्यादित खानगाव ता. काटोल याचे मोबाईल नंबरवर लाईनमेन नामे— राजेन्द्र वाजे यांचा फोन आला व सांगितले की, कोणीतरी अज्ञात चोराने मौजा ढिवरवाडी शिवार येथील फिस्के यांचे शेतातील डी. पी वरील लघुदाब विदयूत वाहिनीचा आठ गाळे मधून एक गाळ एल्यूमिनीयम वायर किंमती अंदाजे १००००/— रु चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोना सुनिता साठवणे पो.स्टे ब. नं. १७६२ काटोल मो. नं. ७७२२०३६७४४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**